औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शनिवार दिनांक १८.३.१९९५ रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. कैलास पाटील | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. प्रकाश मुगदीया | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. दे. हि. मून, उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग. | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४] श्री. विनायक गायके | -"- |
| ५] श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ | -"- |
| ६] श्री. रामकृष्ण बोबडे | -"- |
| ७] श्री. प्रल्हाद चापके | -"- |
| ८] श्री. भास्कर मुंढे, मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ | -"- |
| ९] श्री. विनायकराव देशमुख | -"- |
| १०] श्री. मोहन पाटील टाकळीकर | -"- |
| ११] डॉ. पंडीतराव धानुरे | -"- |
| १२] श्री. विश्वनाथ थोरे | -"- |

विषय क्र. १: दिनांक १७.२.९५ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

मंडळाच्या ९६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचुन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९२

मंडळाच्या दिनांक १७.२.९५ च्या ९६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांचे वाचन होऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: आर-२६, सिडको औरंगाबाद येथील जलनि:स्सारणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेण्याबाबत.

....

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली व माहिती दिली की, आर-२६, सिडको औरंगाबाद येथील जलनि:स्सारणाच्या कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत

आल्या विहीत कालावधीत १३ निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी विहीत दिनांकापर्यन्त म्हणजे १६.१.१९९५ पर्यन्त ४ [चार] भरलेल्या निविदा खालील ठेकेदारांकडून प्राप्त झाल्या. सदर निविदा दिनांक १६.१.१९९५ रोजी कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांचे हस्ते उघडण्यांत आल्या.

| अ.क्र. ठेकेदाराचे नांव | दर | शेरा |
|---|---|---|
| १. मे. ए. सी. कोठारी कॉंट्रॅक्टर, अहमदनगर | ५.२०% कमी | |
| २. मे. अब्दुल मजीद अँड कंपनी | १६.००% कमी | निम्नतम |
| ३. मे. के. एस. गुरु अँड कंपनी औरंगाबाद | ७.५५% कमी | |
| ४. श्री. सलीम पटेल कॉंट्रॅक्टर औरंगाबाद | ९.९९% कमी | |

या अनुषंगाने म. मुख्याधिकारी यांनी मंडळास सांगितले की, मे. अब्दुल मजीद अँड यांची निविदा, निविदा किंमतीच्या १६% कमी प्राप्त झालेली आहे. सदर निविदा उपमुख्य अभियंता/पुणे मंडळ यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविल्या असता, त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"म्हाडाचे हित पाहता निविदा मंडळापुढे मंजूरीस्तव ठेवण्यांत यावी, तसेच ठेकेदाराची मंजूरी असल्यास सुरक्षाठेव ४% पर्यन्त वाढविण्यांत यावी

या अनुषंगाने मंडळाचे सदस्यांनी प्रतिपादन केले की, ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले का ? यावर प्रतिपादन करण्यांत आले की, कमी दराच्या निविदा असल्यामुळे वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आलेले नाही.

मंडळाचे सदस्य श्री. देशमुख यांनी विचारले की, ठेकेदाराची कामाची गुणवत्ता कशी आहे. यावर कार्यकारी अभियंता यांनी प्रतिपादन केले की, ठेकेदाराने यापुर्वी मंडळात काम केलेले आहे. त्याची कामाची गुणवत्ता चांगली आहे.

मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, सदर काम तीन महिन्याऐवजी दोन महिन्यात पुर्ण करण्याची लेखी हमी कंत्राटदाराने दिलेली आहे. जर कंत्राटदाराने दिलेल्या मुदतीच्या आत काम केले नाही. तर मुदतीच्या नंतर प्रत्येक दिवशी दंड आकारण्यांत यावा.

यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, मुदतीच्या आत काम केले नाही तर ठेकेदारास दंड आकारण्यांत येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, सदर कामासाठी प्राप्त झालेली निविदा, निविदा किंमतीच्या १६% कमी दराची असल्यामुळे मंजूर करण्यास हरकत नाही. निविदा मंजूर करित असतांना सुरक्षा ठेव २% ऐवजी ४% घेण्यांत यावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९३

आर-२६ सिडको औरंगाबाद येथील जलनि:स्सारणाच्या कामासाठी निविदा किंमतीच्या [९,४०,७६७]१६% कमी दराची मे. अ. मजीद अँड कंपनी यांची प्राप्त झालेली निविदा मंडळाने मंजूर केली व सुरक्षा ठेव २% ऐवजी ४% घेण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ३: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपुर्ती करणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्य अधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९४

श्री. सी. एस. पठाण लघुटंकलेखक यांनी त्यांच्या पत्नीच्या पोटाच्या आकस्मिक आजारासाठी केलेला खर्च रु. ११३६.०० तसेच श्री. एन. ए. थेरगांवकर वरिष्ठ लिपिक यांनी त्यांच्या पत्नीच्या बाळंतपणामध्ये स्त्रीरोग आणि प्रसुतीविषयक आकस्मिक आजार यासाठी केलेला खर्च रु. ५६१३/- हा प्राधिकरणाच्या दिनांक २२.४.९१ च्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ४: गारखेडा औरंगाबाद येथील सर्वे क्र. १८/१/१, १८/ब/३ व ३/२ अनुक्रमे सि. स. क्र. १५३०३[भाग], १५३०६[भाग] या जमिनीच्या संपादन प्रकरणी श्री. हाजी खान मोह मोतीवाला यांचे मा. सभापतींना उद्देशुन लिहिलेले दिनांक १३.२.९५ चे पत्र.

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

या विषयावर मंडळाच्या सदस्यांनी बरीच चर्चा केली. परंतु या विषयी कांही एक निर्णय घेण्यांत आला नाही. हा विषय पुढील बैठकीचे वेळी निर्णयास ठेवावे असे ठरले... तसेच हाजी जान मोहमंद मोतीवाला यांनी चेअरमन यांचे नांवे दिलेला दि. १६.३.९५ रोजीचा अर्ज मंडळासमोर वाचुन दाखविला व या अर्जावर पुढील बैठकीत टिप्पणी ठेवावी असे ठरले.

विषय क्र. ५: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

---

विषय क्र. १: गंगापूर जि. औरंगाबाद येथे मंडळाने पुरग्रस्ताकरिता बांधलेल्या १३९ गाळ्यांच्या योजनेच्या हस्तांतरणाबा

---

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वा दाखविली.

म. मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, गंगापूर येथे १३ गाळे पुरग्रस्तांकरिता बांधलेले आहे. सदर योजना दि. ३१.७.९४ रोजीच पु झालेली आहे. या योजनेतील गाळ्यांच्या विक्रीच्या किंमतीत किरकोळ दुरूस्ती तथा संरक्षण व देखभालीकरिता चौकीदार नेमणे अशा बाबी करिता तरतुद करण्यांत आलेली नाही. सदरील योजनेतील गाळे वाटप न होता रिकामे पडून राहिल्यास गाळ्यांचे नुकसान होण्याची शक्यता ना येत नाही. म्हणून सदर योजना आणखी विलंब न होऊ देता मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना त्वरीत हस्तांतरीत करण्याचे प्रस्त आहे. असे मुख्य **अधिकारी** यांनी सांगितले व येणे असलेली रक्कम नंतर यथोचितरित्या म. जिल्हाधिकारी यांचेकडून घेणेत यावी असे ठरले.

मंडळाच्या सदस्यांनी यावर चर्चा करून असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९५

---

गंगापूर येथील १३९ गाळ्यांची पूरग्रस्तांची योजना मा. जिल्हाधि औरंगाबाद यांना त्वरीत हस्तांतरीत करण्यांत यावी व गाळा वाटपापु

सुरुवातीस भरावयाची रक्कम रु.१८५८/- प्रति गाळा या प्रमाणे होणारी एकुण रक्कम व हडको कर्जापोटी त्रैमासिक हप्त्याची रक्कम रु. ७४,२२६/- या दोन्ही रकमा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून यथावकाश वसुल करण्यांत याव्यात.

चर्चेच्या ओघात मा.सदस्य श्री.गायके यांनी मॉडर्न एज्युकेशन शिक्षण संस्था या शैक्षणीक संस्थेने रोशनगेट येथील जागा मागणीबाबत अर्ज केला आहे. तो शिफारशीसह प्राधिकरणास पाठविण्यांत यावा असे प्रतिपादन केले.

त्यावर सदस्यामध्ये चर्चा होऊन ही शिक्षण संस्था असुन शिक्षणाचा प्रसार करणे हे तिचे उद्दिष्टे आहे. हा अर्ज शिफारशीसह प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

पटलावरील विषय संपल्यानतर मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

....